राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत जमीन आरोग्य व सुपिकता कार्यक्रम राबविण्यासाठी दुसऱ्या हप्त्याचा निधी वितरीत करणे.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम-१२०२७/११५/२०२५-MAG-1A**
संगणक क्रमांक : ११०५७१९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२
दिनांक : ३० जानेवारी, २०२६

**संदर्भ :-**

१. केंद्र शासनाने https://soilhealth.dac.gov.in/files/Implementation.pdf या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रीय कृषि विकास अभियानांतर्गत मृद आरोग्य पत्रिका बाबतच्या मार्गदर्शक सूचना.
२. राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या इतिवृत्तासंबंधी पत्र क्र. सीएसए-२०२४/प्र.क्र.१४/कार्यासन-२अे, दिनांक २६.०३.२०२५
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५
४. सामाजिक न्याय विभाग, शासन परिपत्रक क्र. विघयो-२०२५/प्र.क्र.५८/अर्थसंकल्प,दि.१५ ०४.२०२५
५. आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.०२/कार्यासन-०६, दि. २१.०४.२०२५
६. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. कृवपदुम १२०२७ /८३ /२०२५ -MAG-1A, दिनांक २५.०४.२०२५ (प्रशासकीय मान्यता)
७. केंद्र शासनाचे मदर सॅक्शनचे पत्र क्रमांक १-१५/२०२५- RKVY दिनांक ३०.०४.२०२५ चे पत्र.
८. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. कृवपदुम १२०२७ /११५ /२०२५ -MAG-1A, दिनांक ०६.०५.२०२५.
९. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. कृवपदुम १२०२७ /१८० /२०२५ -MAG-1A, दिनांक २९.०७.२०२५.
१०. केंद्र शासनाचे मदर सॅक्शनचे पत्र क्रमांक १-१५/२०२५- RKVY दिनांक २१.०१.२०२६ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत जमीन आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रम सुरू केलेला आहे. सन २०१५-१६ पासून ही योजना केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात राबविण्यात येत आहे. सदर योजनेचा समावेश सन २०२२-२३ पासून राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत करण्यात आला. त्यानुषंगाने सदर योजना सन २०२५-२६ मध्ये राबविण्यासाठी संदर्भ क्र.०६ अन्वये रु. ६०८३.७३ लक्ष वार्षिक कृति आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. तथापि, सदर योजनेसाठी रु. ४६४८.३३ लक्ष अर्थसंकल्पित करण्यात आला होता. सदर निधी मंजूर वार्षिक कृती आराखड्याच्या अनुषंगाने अपुरा पडत असल्याने सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात पूरक मागणीद्वारे सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्र व राज्य हिश्श्यासाठी मिळून एकूण रू. १४३५.४४ लक्ष निधी उपलब्ध करून घेण्यात आला. तसेच संदर्भ क्र.८ व ९ येथील शासन निर्णयान्वये सदर योजनेचा पहिला हप्ता वितरीत केला आहे.

केंद्र शासनाने संदर्भ क्र.१० अन्वये राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत जमीन आरोग्य व सुपिकता कार्यक्रम राबविण्यासाठी सन २०२५-२६ मधील दुसऱ्या हप्त्यापोटी केंद्र हिश्शाचा (सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या तिन्ही प्रवर्गांकरीता मिळून) रू. ११,८८,००,०००/- (अकरा कोटी अठ्ठ्याऐंशी लाख

फक्त) निधी वितरीत केला आहे. सदर केंद्र हिश्शाचा निधी व त्याला समरुप राज्य हिस्सा रुपये ७,९२,००,०००/- (रुपये सात कोटी ब्याण्णव लक्ष फक्त) निधी असा एकूण रु. १९,८०,००,००० /- (रुपये एकोणीस कोटी ऐंशी लक्ष फक्त) निधी कृषि आयुक्तालयास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत जमीन आरोग्य व सुपिकता कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र हिस्सा रु. ११,८८,००,०००/- (अकरा कोटी अठ्ठ्याऐंशी लक्ष फक्त) व राज्य हिस्सा (रु. ७,९२,००,०००/- (रुपये सात कोटी ब्याण्णव लक्ष फक्त) असा एकूण रु.१९,८०,००,०००/- (रुपये एकोणीस कोटी ऐंशी लक्ष फक्त) इतका निधी, सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पित निधीमधून, खाली नमूद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय, कृषी आयुक्तालयास वितरीत करण्यात येत आहे.

**(रक्कमा रुपयांमध्ये)**

| | **सर्वसाधारण** | **अनुसूचित जाती** | **अनुसूचित जमाती** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| **केंद्र हिस्सा** | ९,५६,००,००० | १,३०,००,००० | १,०२,००,००० | ११,८८,००,००० |
| **राज्य हिस्सा** | ६,३७,३३,३३३ | ८६,६६,६६७ | ६८,००,००० | ७,९२,००,००० |
| **एकूण** | १५,९३,३३,३३३ | २,१६,६६,६६७ | १,७०,००,००० | १९,८०,००,००० |

२. सदर निधी प्रदान केलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार खर्च करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. या प्रित्यर्थ होणारा खर्च मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येऊन पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

| प्रवर्ग | **केंद्र हिस्सा लेखाशिर्ष** | **राज्य हिस्सा लेखाशिर्ष** |
|---|---|---|
| सर्वसाधारण | **<u>मागणी क्रमांक -डी-३</u>**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(००)(१०१) मृद सर्वेक्षण व चाचणी<br>(००) (१६) कृषि उन्नती योजना - मृद आरोग्य पत्रिका<br>केंद्र हिस्सा- ६०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे०४१)<br>३३- अर्थसहाय | **<u>मागणी क्रमांक -डी-३</u>**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(००)(१०१)मृद सर्वेक्षण व चाचणी<br>(००)(१७) कृषि उन्नती योजना- मृद आरोग्य पत्रिका<br>राज्य हिस्सा- ४०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे०५९)<br>३३- अर्थसहाय |
| अनुसूचित जाती | **<u>मागणी क्रमांक -एन-३</u>**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(००) (७८९), अनुसुचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>(०१)(०१)कृषि उन्नती योजना-मृद आरोग्य पत्रिका<br>केंद्र हिस्सा- ६०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे २५५ )<br>३३- अर्थसहाय | **<u>मागणी क्रमांक -एन-३</u>**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(००) (७८९), अनुसुचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>(०१)(०२) कृषि उन्नती योजना-मृद आरोग्य पत्रिका<br>राज्य हिस्सा- ४०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे २६४ )<br>३३- अर्थसहाय |

| | | |
|---|---|---|
| अनुसूचित जमाती | **मागणी क्रमांक -टी-५**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(७९६), जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१)(०२ ) कृषि उन्नती योजना - मृद आरोग्य पत्रिका<br>केंद्र हिस्सा- ६०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे०८६)<br>३३- अर्थसहाय | **मागणी क्रमांक -टी-५**<br>२४०२ मृद व जल संधारण<br>(७९६), जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१)(०३) कृषि उन्नती योजना - मृद आरोग्य पत्रिका<br>राज्य हिस्सा- ४०% (कार्यक्रम)<br>(२४०२ अे०९५)<br>३३- अर्थसहाय |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

१) सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधीन मार्गदर्शक सूचनांनुसार व केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती नुसार राबविण्यात यावी.

२) खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवुन सदर खर्चाचे लेखा परीक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावेत.

३) योजनेच्या वेगवेगळ्या बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व राज्य शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

४) योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमा खर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरुवातील अखर्चित रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. जेणेकरून पारदर्शी स्वरुपात रकमा विचारात घेता येईल व सदिंग्धता राहणार नाही.

५) कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) सदर योजनेकरीता मंजूर झालेला निधी हा ज्या संवर्गासाठी मंजूर केलेला आहे त्याच संवर्गासाठी खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी.

७) संदर्भाधीन क्र. ७ येथील केंद्र शासनाच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे

८) वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील परिपत्रकातील अटींचे पालन करण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ. क्र. ९ येथे नमूद बाबींची पूर्तता करण्यात यावी.

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक, लेखा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/ टेंडर नियामावली व नियमांचे/ प्रक्रियेचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/P.W.D. म्यॅनूअलच्या अधिन राहून/C.V.C.तत्वानुसार/CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५, सामाजिक न्याय विभाग, शासन परिपत्रक क्र.विघयो-२०२५/प्र.क्र.५८/अर्थसंकल्प, दि.१५.०४.२०२५, आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.०२/कार्यासन-०६,

दि.२१.०४.२०२५ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०१३०१७०५२५६६०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHUSUDAN SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.01.30 17:06:56 +05'30'

**(सुहास सकपाळ)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. मंत्री (फलोत्पादन) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६) मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.

७) मा.प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

९) संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१०) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

११) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.

१२) सर्व विभागीय कृषि सहसंचालक.

१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

१४) सहाय्यक संचालक, लेखा -१, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१५) निवडनस्ती (कार्यासन १-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई